# किशोर सुधारालय, नाशिक

# संक्षिप्त टिपणी

| | | |
|---|---|---|
| १ | **संस्थेचे नाव** | **किशोर सुधारालय नाशिक सी.बी.एस. जवळ, मेळा बस स्टॉप, शरणपुररोड, नाशिक दुरध्वनी क्र. ०२५३-२५७२७६५**<br>**ईमेल bostal.school@gmail.com** |
| २ | **संस्थेची स्थापना** | बोर्स्टल स्कूल कायदा हा १९२९ मध्ये अस्तित्वात आला. त्या अनुसार भारतात सन १९३० साली धारवाड येथे संस्था सुरु करण्यात आली. पुढे महाराष्ट्र राज्य निर्मीती नंतर धारवाड कर्नाटकात गेल्याने सदर स्कूल कळंबा कोल्हापूर येथे १ फेब्रुवारी १९६३ मध्ये सुरु करण्यात आले नंतर कोल्हापूर येथे मध्यवर्ती कारागृह झाल्याने सदर संस्था १ मे १९९० रोजी नाशिक येथील सब-जेल बंद करुन त्या ठिकाणी सुरु करण्यात आली तेव्हा पासून नाशिक शहरात मुख्य बसस्थानका शेजारी (सी.बी.एस. जवळ) असलेल्या सब जेल मध्ये सुरु आहे. |
| ३ | **संस्थेचे क्षेत्रफळ** | ०३.३२५ एकर ( ०१.३३ हेक्टर) आहे. |
| ४ | **बंदी अधिकृत क्षमता** | १०५ बंदी |
| ५ | **पार्श्वभूमी** | किशोर वयीन वयोगटातील वय वर्षे १६ ते २१ पर्यंतच्या किशोर मुलांना गुन्हयात इतर सराईत गुन्हेगारा सोबत कारागृहात ठेवल्यास त्याच्यावर वाईट संस्कार होवून मुले भविष्यात त्यांना सुधारण्याची संधी न मिळताच ते गुन्हेगार होतील हा दृष्टीकोन लक्षात घेवून बाल गुन्हेगार यांना शालेय व औद्योगीक प्रशिक्षण देणारा स्वतंत्र विभाग प्रायोगीक स्वरुपात कारागृहाचे आवारातच श्री. एव्हीन रसेश बुश या इंग्लंड मधील कारागृह अधिकारी यांनी सुरु केला. व हा प्रयोग यशस्वी झाल्याने अशी संस्था सुरु करण्याची कल्पना उदयास आली व यातून ब्रोस्टल स्कूल नावाने संस्था सुरु झाली. |

| | | |
|---|---|---|
| **६** | **पूर्व इतिहास** | भारतात पहिले बोर्स्टल स्कूल मुंबई विभागात झाले. ब्रोस्टल कायदा अस्तीत्वात सन १९२० आला व धारवाड त्यावेळी मुंबई विभागात असल्याने सन १९३० मध्ये संस्था धारवाड येथे सुरु करण्यात आली. पुढे महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्याने व धारवाड हे कर्नाटक राज्यात गेल्याने पुढे १ फेब्रुवारी १९६३ मध्ये कोल्हापूर येथील कळंबा गांवात सुरु करण्यात आले. पुढे त्या स्कुलच्या जागी मध्यवर्ती कारागृह झाल्याने सदरची स्कूल ही १ मे १९९० मध्ये नाशिक येथील शहराचे मध्यवर्ती ठिकाणी असलेले सब-जेल मध्ये वर्ग करण्यात आली व सध्या तेथे सुरु आहे. |
| **७** | **किशोर मुले दाखल करण्याची पध्दत** | किशोरवयीन गुन्हेगारांची न्यायालयीन प्रकरणे हाताळतांना त्यांना रुढ कायदा अंतर्गत कारागृहीन शिक्षा सुनावण्या ऐवजी ब्रोर्स्टल स्कूल कायदा १९२९ चे कलम ६ व ९ मधील तरतुदी तसेच ज्युव्हिनाईल जस्टीस ॲक्ट (केअर ॲन्ड प्राटेक्शनऑफचिल्डन ॲक्ट २००० मधील नियम ६ (१२) व ८(१२) सब रुल (३) सेक्शन ३३ किंवा अंडर प्रोव्हिजन सब- सेक्शन (१) सेक्शन १५ अनुसार वय वर्षे १६ ते २१ मधील मुलांना प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी वा मुख्य न्यायदंडाधिकारी व त्यावरील दर्जा असलेले न्यायाधिश कमीत कमी ३ व जास्तीत जास्त ५ वर्षे स्थानबध्दतेचा आदेश काढतात व वरील तरतुदी अनुसार किशोर सुधारालय नाशिक येथे वारंट काढून पाठवितात. |
| **८** | **कारागृहातुन मुलांना मुक्त करण्याची पध्दत** | किशोर सुधारालयांत मुले यांना स्थानबध्दतेचे आदेश घेवून पोलीस कर्मचारी यांनी दाखल केल्या नंतर बंदी यांचे जन्म दाखला मागावून बंदी याचे वयोमान निश्‍चित केले जाते व ज्या वया पर्यंत ठेवण्याचे आदेश दिले जातात त्या अनुसार सुटकेची दिनांक निश्चीत केली जाते. तसेच बंदी हे जामीनावर जावू शकतात. |
| **९** | **संस्थचे कार्य** | या संस्थेत किशोर दाखल झाल्या नंतर त्यांचे शिक्षण किती झाले आहे तसेच त्याची समाजिक व भौगोलीक वातावरणची तपासणी करण्यात येते. व त्यानुसार शिक्षणाची सोय केली जाते. संस्थेत शिक्षक कर्मचारी असून ते मुलांना शिक्षण देतात. कारागृहात प्रौढ शिक्षणासोबत इयत्ता १ ते १० पावेता शिक्षण दिले जाते. जी मुले १० वी पास किंवा नापास जरी झाली त्यांना महाराष्ट्र शासनाने दिलेल्या नियमानुसार औद्योगीक प्रशिक्षण शिक्षण ( I.T.I.) मध्ये प्रवेश मिळतो व मुले तेथे पुढील शिक्षण घेवून जातात. तसेच मुलांना औद्योगीक प्रशिक्षण दिले जाते. प्रामुख्याने शिवणकाम, सुतारकाम, स्क्रिन प्रिंटींग वायरमन, सुती बॅग, मेनबत्ती, उटणे, आकाश कंदील, सायकल, मोटारसायकल रिपेअरिंग, रोप वाटीका, बागकाम इ. प्रकारचे प्रशिक्षण दिले |

<table>
<tr><td></td><td></td><td>जाते. सदर प्रशिक्षण शासकिय आय.टी.आय मार्फत तसेच स्थानिक सामाजिक संस्थां मार्फत मुलांना दिले जाते. सध्या १४ मुले यांनी विविध प्रशिक्षण पूर्ण केले असून तीन मुले शासकिय औद्योगिक विद्यालयांत जात आहेत.</td></tr>
<tr><td>१०</td><td>मुलांचे दैनंदिन कार्यक्रम</td><td>
<table>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><th>अ.क्र</th><th>वेळ</th><th>कार्यक्रम</th></tr>
<tr><td>१</td><td>स. ५.३० ते ६.००</td><td>ओपनिंग</td></tr>
<tr><td>२</td><td>०६-०० ते ०६-३०</td><td>वैयक्ती स्वच्छता</td></tr>
<tr><td>३</td><td>०६-३० ते ०८-००</td><td>परिसर सफाई नंतर योगासणे, पी.टी. व्यायाम, हास्य परेड</td></tr>
<tr><td>४</td><td>०८-०० ते ०८-३०</td><td>नास्ता</td></tr>
<tr><td>५</td><td>०८-३० ते १०-००</td><td>परिसरातील शेती व इतर कामे.</td></tr>
<tr><td>६</td><td>१०-०० ते ११-००</td><td>जेवण</td></tr>
<tr><td>७</td><td>११-०० ते ०४-००</td><td>शाळा व औद्यो. प्रशि</td></tr>
<tr><td>८</td><td>०४-०० ते ०५-३०</td><td>मैदानी खेळ</td></tr>
<tr><td>९</td><td>०५-३० ते ०६-००</td><td>जेवण</td></tr>
<tr><td>१०</td><td>०६-३०</td><td>सामुहीक प्रार्थनावबंदी</td></tr>
<tr><td>११</td><td>०९-००</td><td>झोपणे</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>११</td><td>संस्थेची इमारत</td><td>सदर इमारत सन १९२६ मधील असून पूर्वी हे सब-जेल होते नंतर सन १९९० मध्ये येथे ब्रोर्स्टल स्कूल कोल्हापूर येथुन या इमारतीत आले. आतील भागात (३०-२०-११ फूटाचे) आठ बॅरेक आहेत. तसेच दोन मोठया बॅरेक आहेत. एकून बॅरेक समोर ०६ सेप्रेट विभाग आहेत. तर माहिला विभागात वेगळा असून तेथे दोन रुम व सहा सेप्रेट आहेत. तसेच अद्यावत स्वयंपाकगृह आहे. व मुख्यव्दारात तीन कार्यालये असून त्यात आस्थपना विभाग व अधिकारी बसतात.</td></tr>
<tr><td>१२</td><td>मनोरंजनाची साधने</td><td>मुलासाठी कबड्डी, हॉलीबॉल मैदानी खेळ तर आतील भागात कॅरम बोर्ड, बुंध्दीबळ, साधने आहेत तसेच रंगित दूरदर्शन संच बसविण्यात आलेले आहेत. तसेच संगणक लावलेले असून त्यातून विविध प्रकाराचे मनोरंजनाचे व शैक्षणिक कार्यक्रम दाखवले जातात.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| **१३** | **संस्थेत झालेले विविध प्रशिक्षण कोर्सेस** | १) डॉ जयकर यांची व्याख्यान माला सुरू करुन त्यात विविध विषयाचे प्रशिक्षण देण्यात आले.<br>२) जयेश व्हिजन तर्फे साक्षरता सिनेमा दाखविण्यात आला.<br>३) जन शिक्षण संस्था नाशिक मार्फत-स्क्रिन-प्रिंटींग कोर्स घेतला.<br>४) ग्लोबल कॉलेज ऑफ नर्सींग मार्फत नर्सींग प्रशिक्षण देण्यात आले.<br>५) एम.व्ही.पी कॉलेज मार्फत-संगणक प्रशिक्षण देण्यात आले.<br>६) जन शिक्षण संस्था नाशिक मार्फत बुक बायडींग कोर्स घेतला.<br>७) प्रजापिता ब्रम्हकुमारी इश्वरीय विद्यालय, नाशिक यांचे वतीने ७ दिवसाचे अध्यात्मीक प्रशिक्षण सत्र<br>८) इंडीयन रेड क्रॉस सोसायटी शाखा नाशिक मार्फत एड्स जन जागृती कार्यक्रम घेण्यात आला.<br>९) जन शिक्षण संस्था नाशिक व स्टेट बँक आफॅ इंडीया, नाशिक यांचेमार्फत किशोरांसाठी (१) सॉफट टॉईज बनविणे व (२) फॅन्सी बॅग बनविणे हे प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.<br>१०)मॉ वैष्णवी सोशल ॲन्ड कल्चरल ऑर्गनायजेशन, नागपुर यांचे मार्फत तुषार सुर्यवंशी यांचा सप्त खंजेरी वादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.<br>११)आर्ट ऑफ लिव्हिंग श्री विजय नेटके यांचा किशोरांसाठी कार्यक्रम घेण्यात आला.<br>१२)युगांत फाऊंडेशन, नाशिक यांचे मार्फत किशोरांसाठी योगा, मेडीटेशन, ग्रिटींग कार्ड बनविणे तसेच मोहन ते महात्मा व चित्र प्रदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.<br>१३)प्रदिप मोडक योग शिक्षक, नाशिक यांचे मार्फत किशोरांसाठी मंत्र, सुर्यनमस्कार, योगासने व प्राणायम प्रशिक्षण घेण्यात आले.<br>१४)उदय बहु उद्येशिय सामाजिक व शैक्षणिक संस्था, नाशिक यांचे मार्फत किशोरांसाठी नेतृत्व गुण विकास कार्यशाळा घेण्यात आली.<br>१५)युवा परिवर्तन, नाशिक यांचे मार्फत प्राथमिक संगणक ज्ञान प्रशिक्षण घेण्यात येत आहे.<br>१६)जन शिक्षण संस्था नाशिक मार्फत टु व्हिलर रिपेरींगचा कोर्स घेतला.<br>१७)युवा परिवर्तन, नाशिक यांचे मार्फत किशोरांकरीता इंग्लिश स्पीकींग कोर्स घेण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| **१४** | **ग्रंथालय** | संस्थेत एकूण -७८७ पुस्तके असून श्री. भैय्युजी महाराज यांनी रु. ५०००/-ची पुस्तके खरेदी करुन दिली आहेत. तसेच मुलांसाठी एक संगणक दिला आहे. मा. मुख्यालय, पुणे यांचे कडुन संस्थेस १३४ पुस्तके देण्यात आलेली आहेत. |